चित्रपट

# मूळची समतावादी संस्कृती जागवणारा ‘थंगलान’

आशालता कांबळे

‘थंगलान’ बघून डोळ्यासमोर उभ्या राहिल्या, इतिहासातून समजलेल्या आणि आज प्रत्यक्ष घडत असलेल्या काही घटना –

या देशात समतेवर आधारलेली प्राचीन संस्कृती, जी स्त्रियांच्या कर्तबगारीला, तिच्या नेतृत्वाला स्वीकारत होती. ‘थंगलान’मधील आरती या स्त्रीचं नेतृत्व, शौर्य बघताना माझ्या डोळ्यासमोरून तरळून गेल्या आपापल्या राज्यांचं प्राणपणाने रक्षा करणाऱ्या हिडिंबा, त्राटिका, शूर्पणखा.

यानंतर अनेक वर्षांनी, पुरुषप्रधान संस्कृती मानणाऱ्या घोड्यावरून आलेल्या आर्यांनी या देशात येऊन येथील मूळ रहिवाशांच्या जमिनी ताब्यात घेतल्या आणि त्यांना गुलाम बनवलं. हळूहळू वर्णव्यवस्था प्रस्थापित करून या गुलाम बनवलेल्या समूहांना ‘नीच जातीचे’ म्हणून त्यांचे राहणीमान उच्च जातीयांपेक्षा वेगळे कसे राहील असे नियम बनवले. (थंगलान हा नायक आणि त्यांची वस्ती कपडे परिधान करण्याची परवानगी नसलेली)

यातूनही काही जागा सुरक्षित राहिल्या त्यांच्या मूळ संस्कृतीनुसार, दऱ्याखोऱ्यात-जंगलकपारीत राहणाऱ्या, निसर्गाचं रक्षण करणाऱ्या, त्याला इजा न करता त्याच्यासोबतीने समृद्ध जीवन जगणाऱ्या वस्त्या (‘थंगलान’मधील जिथे सोनं आहे अशा उंच डोंगरावरील वस्ती)

यातीलच एक ‘नागा संस्कृती’चा समूह, जो स्त्रीला राणीपदाचा, नेतृत्वाचा बहुमान देतो आणि नैसर्गिक संपत्तीची जपणूक करत समतेचं समृद्ध जीवन जगतो.

कड्या-कपारी, पर्वत रांगा यांच्या कुशीत असलेल्या निसर्गसंपत्तीची चाहूल घोड्यावरून आलेल्या विषमतेच्या संस्कृतीवाल्याना लागली तेव्हा त्यांनी आपले गुलाम बनवलेल्या इथल्याच मूळ रहिवाशांना घेऊन या ‘नागा संस्कृती’वर हल्ले चढवले. यांची समतेची प्रतीके उद्ध्वस्त केली. पण तरीही ‘नागा संस्कृती’ जिवंत राहिली ती कडे-कपारीतून आदिवासी समूहाच्या रूपाने. (थंगलानला स्वप्नात ही दृश्ये दिसत राहतात. तो त्यांच्या आणि आपल्या पूर्वजांच्या युद्धाच्या कथा सांगत राहतो आपल्या मुलांना गोष्टींच्या रूपाने)

हजारो वर्षे उलटल्यानंतर इंग्रजांसारखे हुशार लोक इथे आले. त्यांनी इथल्या देशाचा अभ्यास केला. येथील निसर्गाच्या कुशीत भरपूर साधन संपत्ती असल्याचा त्यांना शोध लागला. त्यांनी येथील पराक्रमी-शूर, निडरपणे जगणाऱ्या निर्भय लोकांना सोबत घेऊन ही साधनसंपत्ती लुटायचा डाव टाकला. त्या हासील केलेल्या संपत्तीतील

लेखिका मुंबईस्थित आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्या व निवृत्त प्राध्यापिका आहेत.
k.ashalata@yahoo.co.in

छोटासा हिस्सा, थोडासा मानसन्मान देऊन स्वतःकडे त्यांना वळवलं. या समूहाला नाहीतरी येथील उच्चवर्णीयांनी-जमीनदारांनी अपमानाचं जीवन जगायला भाग पाडलं होतं. ते सहन न झालेल्या या लोकांनी त्यांच्यापासून दूर जाणे पसंत केले. त्यांनी दिलेल्या गुलामीच्या खुणा त्यांनी झुगारून दिल्या. 'थंगलान'मधील इंग्रज म्हणजे शहरातील भांडवलदारही असू शकतात.

हे लोक आपल्या ताब्यात आल्याची खात्री मिळताच इंग्रजांनी किंवा भांडवलदारांनी त्यांनाही आपल्या सत्तेचा हिसका दाखवला. आपल्यासाठी राबवून घेतलं. त्यांच्या जोडीने येथील उच्चवर्णीयांनीही त्यांना पुन्हा पहिल्या अवस्थेत आणून ठेवण्याचा चंग बांधला. दोन्हीकडून गुलाम झालेल्या लोकांना अखेर समजली आपली फसवणूक! कधीकाळी आपल्याच कुळातले असलेले, आपल्याशी नातं असलेले हे आपले पूर्वज, आज अनेक जाती-समूहांत विभागले आहेत. आपण सर्वच एक आहोत. आपण भांडता कामा नये एकमेकांशी, तर एकत्रित मिळून आपल्या देशातील समृद्धीचं जतन करत त्याचा तृष्णारहित उपभोग घेत, या भूमीचे संतान म्हणून समतेच्या संस्कृतीचं जतन करीत सन्मानाने जगलं पाहिजे. या देशात समतेची संस्कृती निर्माण करणारे तथागत गौतम बुद्ध. या सिनेमात त्यांची दिसणारी मूर्ती म्हणजे समृद्धीचं प्रतीक आहे. येथील समृद्धी लुटताना ब्राह्मणाच्या सांगण्यावरून राजसत्तेने बुद्धाचं मुंडकं छाटलं आणि जमिनीत खोलवर गाडून टाकलं. पण हजारो वर्षांनंतर हे मुंडकं पुन्हा या भूमीत खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतील महामानवानेच शोधून पुन्हा जोडलं. या भूमीत पुन्हा बुद्ध रुजवला संविधानातील समतेच्या रूपाने.

आज घडीला आपल्या देशात असलेले धनदांडगे, राजकीय आणि धार्मिक हुकूमशहा यांना आतापर्यंत जे आपल्या कह्यात राहून गुलामीचं जीवन जगत होते त्यांच्या डोक्यात या संविधानाने समतेची जाणीव करून दिल्यामुळे निर्माण होत असलेली समजदारी हीच डोकेदुखी ठरतेय. त्यांना समृद्धी लुटायची आहे संपूर्ण देशातल्या कानाकोपऱ्यातली. म्हणूनच ते कुणा एका समूहाला दुसऱ्या समूहाबद्दल भडकावून कधी माणिपूरचा संघर्ष घडवून आणतात तर कधी जंगलांचं रक्षण करीत जगणाऱ्यांना नक्षलवादी ठरवून त्यांच्याच भाऊबंदांकरवी गोळ्या घालून मारताहेत. कधी देशद्रोही, धर्मद्रोही ठरवून मारताहेत. इतकंही करून आपल्याला मोकळं रान मिळत नाहीय म्हणून जाती-धर्म अशी विभागणी करून त्यांच्यात उभी आडवी फूट पडताहेत. ('थंगलान'मध्ये दोन आदिवासी समूहांतील युद्ध कधी मणिपूरमधील दोन समूहाचा संघर्ष लक्षात आणून देतो तर कधी जाती-जाती आणि धर्मा-धर्मातील संघर्ष लक्षात आणून देतो.)

'थंगलान'मध्ये शेवटी सोने मिळवण्यासाठी नागा लोकांशी लढणाऱ्या आदिवासी समूहांना कळून चुकतं की, हे नागा लोक आणि ही सोनं असलेली म्हणजेच समृद्धीची भूमी ही आपलीच आहे. आपण नागा लोकांशी एकत्रित मिळून या भूमीचं संरक्षण करायला हवं. या देशातील मूळच्या समतेच्या संस्कृतीचं जतन करायला हवं. आपण मिळून या देशाला लुटू पाहणाऱ्या धनदांडग्यांशी लढायला हवं. देशाची लूट करण्यात त्यांना मदत न करता त्यांना एकत्रित ताकदीने थोपवायला हवं. या देशात पुन्हा एकदा संविधानाने निर्माण केलेली समतेची संस्कृती सांभाळायला हवी. इथली नैसर्गिक साधन-संपत्ती ओरबाडण्याचा विचार न करता तिचं जतन करत करत तिचा उपभोग घेतला तरच देशातील सर्वांनाच समृद्धीचं जीवन जगता येईल.

'थंगलान' हा सिनेमा प्रतीकात्मकतेने उभा केलेला आहे. यातील 'बुद्ध' हे समतेचे-नीतीमूल्यांचे प्रतीक आहे तर 'सोने' म्हणजे समृद्धीचे प्रतीक आहे. बुद्ध आणि समृद्धी यांचं अतूट नातं आहे. बुद्धांनी निसर्गाचं रक्षण करत, निसर्गाला न ओरबाडता निसर्गातील समृद्धीचा तृष्णा न बाळगता उपभोग घ्यायला सांगितला

आहे. या संपूर्ण सिनेमात बुद्धमूर्ती असे संदेश घेऊन वारंवार समोर येते. आरती ज्या भूमीचं रक्षण करते त्या भूमीतील संपूर्ण बुद्धमूर्ती...युद्धात मुंडकं तोडून दूर फेकलं गेलेलं आणि धड तेवढं जागेवर असलेली अर्धवट बुद्धमूर्ती...थंगलान आपल्या माणसांना घेऊन साहेबाबरोबर त्या भूमीत जातो तेव्हा जमिनीत गाडल्या गेलेल्या मूर्तीचा शोध लागल्यानंतर तेथील धडाला जोडून पुन्हा उभी राहिलेली बुद्धमूर्ती आणि नंतर संपूर्ण सिनेमाभर अधूनमधून दिसत असलेली बुद्धमूर्ती. ही बुद्धमूर्ती अटीतटीच्या प्रसंगी समोर दिसते. जणू ती मानवी जीवनासाठी मार्गदर्शक आहे.

येथील मूळ संस्कृती समतेची होती हे दाखवणारा एक महत्त्वाचा प्रसंग अतिशय सुंदर पद्धतीने सिनेमात आलाय. थंगलानला 'तुम काबिल हो' असं म्हणून त्याच्यावर खुश होऊन साहेब त्याला नवीन पांढरे कपडे देतो आणि तुझ्या वस्तीतील माणसांना इकडे घेऊन ये म्हणून सांगतो. आनंदी झालेला थंगलान घोड्यावर बसून आपल्या वस्तीत येतो. सारी वस्ती आनंदी होते. त्याने बायकांसाठी चोळ्या आणलेल्या असतात. याआधी अशा चोळ्या घालायची परवानगी त्यांना 'नीच जातीच्या' म्हणून व्यवस्थेने नाकारली होती, अगदी पिढ्यानपिढ्या! म्हणूनच या चोळ्या अंगात घालतात कशा हेही या स्त्रियांना ठाऊक नसतं. 'कैसे डालते है रे ये?' असा प्रश्न त्यामुळेच समोर येतो. मग, 'ये देखो, पहले हाथ डालनेका' असं म्हणत एकजण एकीला मदत करते आणि मग सगळ्या आत जाऊन चोळ्या घालून बाहेर येतात. अगदी आनंदाने भान हरपून नाचतात. इथल्या उच्च वर्णीय स्त्रियाच कपडे - दागिने घालून कशा तोऱ्यात वावरायच्या आणि व्यवस्थेने नीच जातीच्या मानलेल्या स्त्रिया कशा व्यवस्थेने भाग पाडल्यामुळे अर्धनग्न अवस्थेत राहायच्या हा विरोधाभास दाखवण्यासाठी, जमीनदाराची सजलेली बायको जमीनदारासोबत उपस्थित दाखवलेली आहे. कारण प्रत्यक्षात जमीनदार शेताकडे येताना बायकोला सोबत कधीच आणत नसतो. ती निव्वळ घरातली बाहुली असते. उलट नीच जातीतील समजल्या जाणाऱ्या किंवा आदिवासी समूहातील बायका पुरुषाच्या बरोबरीने कष्ट करून कुटुंब चालवण्यात, कुटुंबाचे निर्णय घेण्यात सामील असतात. फक्त घरकाम करण्यातच किंवा मुलांचा पूर्णवेळ सांभाळ करण्यातच त्या आपलं कर्तव्य मानत नाहीत. ही अशी स्त्री- पुरुष समानतेची संस्कृती दाखवण्यासाठीचा सिनेमातील प्रसंग असा-

त्याने आणलेला खाऊ तो आपल्या बायडीला वाटायला सांगतो. तर बायडी म्हणते, 'तू जा आणि आणून वाट. तुला हात नाहीत का?'

थांगलान हे ऐकून गोड हसतो, म्हणतो 'ये तो सही बोल रही है' तो आत जाऊन खाणं घेऊन येतो आणि स्वतःच्या हातानी सगळ्याना वाटतो. दुसरी एक गोष्ट की, थंगलानदेखील मुलं कडेवर घेतो, त्यांना गोष्ट सांगून झोपवतो. पुरुषप्रधान व्यवस्थेत ही कामं फक्त बाईवर लादली आणि पुरुषाला हुकूम देणारा राजा बनवलं. तर ही येथील मूळची स्त्री-पुरुष समानतेची संस्कृती होय. स्त्रीच्या संमतीशिवाय नवरा नावाचा पुरुषसुद्धा तिच्या शरीराला सेक्सच्या भावनेने स्पर्श करू शकत नाही, हेही एका दृश्यातून दाखवलंय. तर ही अशी मूळची स्त्री-पुरुष समानतेची संस्कृती होय. स्त्रीचं कर्तृत्व-तिचं नेतृत्व मान्य करणारी! तिच्या क्षमतांवर विश्वास ठेवणारी!

खूप कलात्मकतेने, छोट्या कृतीतून आणि हलक्या फुलक्या संवादातून या सिनेमात हे सर्व दाखवलेलं आहे. सिनेमा बघताना कधीकाळी 'सोने की चिडीया' अशी ओळख असलेल्या आपल्या देशाला पुन्हा एकदा त्या समृद्ध अवस्थेत आणण्यासाठी लेखणीचं शस्त्र बनवून आपलं उभं आयुष्य वेचलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर डोळ्यासमोर दिसत होते. 'शूद्र पूर्वी कोण होते' हा एकच ग्रंथ जरी सर्व शूद्रांनी वाचला तरी या देशाला लुटू पाहणाऱ्या भांडवलदारी-जातीयवादी शक्तींना कसं थोपवायचं हे नक्की समजेल. ●